# इंडस हेल्थ प्लसतर्फे 'क्विट टूडे क्विट नाऊ' मोहीम

## राज्यात धूम्रपान करणाऱ्यांमध्ये सात टक्क्यांनी वाढ : अमोल नाईकवाडी यांची माहिती

**प्रतिनिधी**

पणजी

इंडस हेल्थ प्लसतर्फे ३१ रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त पणजीत 'क्विट टूडे, क्विट नाऊ' मोहीम सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीम तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामासंदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

सदर मोहिमेला पणजी येथील आयनॉक्स आवारात सुरुवात करण्यात आली. यावेळी सिगारेट आकाराची वेशभूषा केलेल्या दोन प्रतिनिधींनी लोकांना धूम्रपान सोडण्यास व आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्यास प्रोत्साहित केले. दिवसभर राबविण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान प्रतिनिधींनी शेकडो लोकांना म्हणजेच जवळपास २५० ते ३०० पेक्षा अधिक लोकांना माहिती प्रदान देण्यात आली. सिगारेट व तंबाखू सेवनाच्या अपायकारक परिणामांविषयी वास्तविकता प्रकट करणारी बुकलेट्स यावेळी वितरित करण्यात आली.

**धूम्रपानामुळे फुफ्फुसाचे कार्यसंचालन दहा वर्षांनी कमी**

आजची तरुणपिढी फॅशन व मित्र–मैत्रिणींच्या दबावामुळे धूम्रपानाची अपायकारक सवय अंगिकारत आहे. यामुळे मुख्यत: तरुण पिढीमध्ये कॅन्सर व फुफ्फुसाचे आजार यांचा धोका वाढत आहे. यामुळे वास्तविक वयाच्या तुलनेत फुफ्फुसाचे कार्यसंचालन दहा वर्षांनी कमी होत आहे. म्हणूनच अशा प्रकारची जनता जागरूकता मोहीम अविरत प्रगती करेल. तसेच लोकांमध्ये कोणत्याही स्वरूपात तंबाखूचा वापर कमी करण्यासंदर्भात एक सकारात्मक प्रभाव निर्माण करेल, असे इंडस हेल्थ प्लसचे प्रतिबंधात्मक हेल्थकेअर स्पेशालिस्ट व संयुक्त व्यवस्थापकीय संचालक अमोल नाईकवाडी यांनी पणजीत सांगितले.

**धूम्रपान करणाऱ्यांत सात टक्के वाढ**

मागीलवर्षाच्या तुलनेत गोव्यामध्ये धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येमध्ये सात टक्क्यांनी वाढ झाली आहे. ज्यामध्ये २५ ते ३५ वयोगटातील धूम्रपान करणाऱ्या महिलांच्या संख्येतही वाढ दिसून आली आहे.




**पणजी : 'क्विट टुडे, क्विट नाऊ' मोहिमेला प्रारंभ केल्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना अमोल नाईकवाडी.**

गोव्यामधील १८००० लोकांच्या प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीवर आधारित व इंडस प्लसद्वारे सादर करण्यात आलेल्या ॲबनॉर्मलिटी रिपोर्टमध्ये निदर्शनास आले आहे की, मागील वर्षाच्या तुलनेत ४५ ते ५५ वयोगटातील १२ ते १५ टक्के पुरुष अधिक प्रमाणात तंबाखूचे सेवन करतात. त्याशिवाय ५२ टक्के प्रौढांना घरातच धूम्रपान करण्याची सवय आहे. तरुण पिढीमधील १५ टक्क्यांपेक्षा अधिक पुरुष व स्त्रियांना फुफ्फुस आणि तोंडाचा कॅन्सर होण्याचा धोका आढळून आला आहे. धूम्रपान व तंबाखूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींमध्ये २० ते २२ टक्के पुरुष व १५ ते १८ टक्के स्त्रियांना हृदयविषयक आजार असल्याचा धोका आढळून आला आहे.

४ ते ७ टक्के लोकांमध्ये छातीत दुखण्याची समस्या आढळून आली असून ४ ते ५ टक्के ब्रॉंकायटिस व चेस्ट कंजक्शनपासून पीडित होते. तज्ज्ञांचा विश्वास आहे की जर लोक तंबाखूचे सेवन टाळून शारीरिकदृष्ट्या सक्रीय राहिले व त्यांनी आरोग्यदायी आहाराचे सेवन केले तर तोंडाचा कॅन्सर व श्वसनविषयक आजारांवर नियंत्रण मिळवता येऊ शकते, अशी माहिती नाईकवाडी यांनी दिली.